ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3134. Licence No. 53.

वर्ष २७ | पुणें, बुधवार तारीख ५ एप्रिल, १९६१ | अंक ७

## विविध माहिती

**पाकिस्तानला अमेरिकेची मदत चालू राहाणार**— पाकिस्तानचे अर्थमंत्री अमेरिकेचा दौरा करून परत आले. त्यांनीं परत आल्यावर एका मुलाखतींत असें जाहीर केलें कीं, पाकिस्तानला अमेरिकेकडून मिळणारी आर्थिक व लष्करी मदत पूर्वीपेक्षाहि अधिक मिळण्याचा संभव आहे. येत्या चार वर्षांत पाकिस्तानला अमेरिकेकडून दरसाल २५ कोटी डॉलर्सचा शेतीचा मालहि मिळणार आहे.

**श्रीरामपूर येथें संशोधन-संस्था**—साखर व ऊंसविषयक संशोधन करण्याची भारतामधील दुसरी संशोधन-संस्था नगर जिल्ह्यांतील श्रीरामपूर ह्या ठिकाणीं काढण्यांत यावयाची आहे. अशा प्रकारची एक संस्था उत्तर प्रदेशांत कानपूर ह्या ठिकाणीं आहे. संस्थेसाठी ३० एकर जागा मिळविण्याचे कामास प्रारंभ करण्यांत आला आहे.

**मद्रास जवळील टेलिप्रिंटरचा कारखाना**—मद्रास जवळ काढण्यांत येणाऱ्या टेलिप्रिंटरच्या कारखान्यांत १९६१ च्या अखेरीस प्रत्यक्ष उत्पादनास प्रारंभ करण्यांत येईल. हा कारखाना भारत सरकारच्या मालकीचा राहणार असून तो काढण्याच्या कामीं एका इटालिअन कंपनीचें सहकार्य मिळविण्यांत आलें आहे. तेथें प्रथम फक्त जुळणीचें काम केलें जाईल.

**स्त्रियांच्या संख्येंत घट**—भारतांत नुकत्याच झालेल्या शिरगणतीच्या कामाच्या अहवालावरून असें आढळून आलें आहे स्त्री पुरुषांपेक्षा स्त्रियांची संख्या कमी झालेली आहे. ह्याचें कारण नक्की सांगतां येण्यासारखें नाहीं. परंतु सरकारनें बाळंतपणांत होणाऱ्या स्त्रियांच्या व लहान मुलांच्या मृत्यूकडे अधिक लक्ष पुरविण्याची व्यवस्था केली आहे.

**बिनकष्टाची प्रसूति**—इटलीमधील एका डॉक्टरनें कसलाहि त्रास अगर वेदना न होता बाळंतपण करण्याचा शोध लावला आहे. हें साध्य करण्यासाठी फक्त तीन इंजेक्शन्सचा उपयोग करण्यांत येतो. प्रसूति झाल्यावर मूल अवघें ९० सेकंद अर्धवट शुद्धींत असतें. मुलाच्या मातेलाहि कांहींच त्रास सोसावा लागत नाहीं. हा शोध लावण्यासाठी डॉक्टर २० वर्षें प्रयत्न करीत होते.

**पंजाबांत सहकारी कारखाना**—पंजाबमध्यें सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारा साखरेचा चवथा कारखाना काढण्यांत येणार आहे. ह्या कारखान्यासाठी १॥ कोटी रु. भांडवल लागेल व त्यांत रोज १,२०० टन ऊंस गाळला जाईल. पंजाबमध्यें भोगपूर, पानिपत व रोहटक ह्या ठिकाणीं तीन सहकारी कारखाने पूर्वींच काढण्यांत आले आहेत. तिन्ही कारखाने मिळून रोज ३,७५० टन ऊंस गाळतात.

**तेलाच्या शुद्धिकरणासाठी वाटाघाटी**— गुजरातमधील अंकेलेश्वर भागांत सांपडणारें खनिज तेल शुद्ध करण्याच्या कामांत भारतामधील परदेशी कंपन्यांनीं साह्य करावें अशी भारत सरकारची इच्छा सर्व परदेशी कंपन्यांना कळविण्यांत आली होती. ह्या बाबतींत बर्माशेल, काल्टेक्स व स्टॅन्व्हॅक ह्या कंपन्यांशीं लवकरच वाटाघाटी सुरू होणार आहेत. स्टॅन्व्हॅक कंपनीच्या मतानें सर्व कंपन्यांकडे सारखें तेल शुद्धीकरणासाठी वाटून देण्यांत यावें.

**इलेक्ट्रिक आगगाड्यांचे डबे**—आगगाडीचे डबे तयार करणाऱ्या पेरांबूर येथील कारखान्यांत विजेच्या गाड्यांना लागणारे डबे नव्यानें तयार करण्यांत येणार आहेत. कलकत्ता विभागांतील रेल्वेमार्गांचें जें विद्युतीकरण करण्यांत येणार आहे त्याला लागणाऱ्या १५ कोटी रुपये किंमतीच्या डब्यांची मागणी रेल्वे बोर्डानें कारखान्याकडे नोंदविली आहे. १९६२ अखेर डबे मिळूं लागतील.

**वीजनिर्मितीचीं छोटीं केंद्रें**—हिमाचल प्रदेशांत सिमल्यापासून १८ मैलांवर वीजनिर्मितीचें एक छोटें केंद्र उभारण्यांत आलें आहे. हिमाचल प्रदेशांत वाहाणाऱ्या कांहीं नाल्यांना वितळलेल्या बर्फापासून पाण्याचा पुरवठा होतो. त्याचा फायदा घेऊन हें केंद्र उभारण्यांत आले आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत अशीच आणखीं १३ केंद्रें उभारण्यांत येणार आहेत. हें पहिलें केंद्र प्रायोगिक आहे.

**आंकडेवार माहितींत मोठ्या चुका**—भारताच्या नियोजन समितीचे एक सभासद श्रीमन् नारायण ह्यांनीं एका प्रसंगीं बोलतांना असें सांगितलें कीं देशाच्या आर्थिक विकासासाठी गोळा करण्यांत येणाऱ्या आंकडेवार माहितींत मोठ्या चुका असतात. अन्नधान्याच्या उत्पादनाचा आंकडा ७·५ कोटी टनांपासून ९·६ टनांपर्यंत वेगवेगळा अजमावण्यांत आला आहे.

**प्रेमिकांनो सावधान**—नागपूरमधील जुम्मा तळ्यांत कांहीं दिवसांपूर्वी एका तरुणाचें प्रेत तरंगतांना आढळलें. प्रेतावरील कपड्यांत एक चिठ्ठीहि आढळून आली. तरुणांनीं आधुनिक तरुणींच्या कपट-जालांत सांपडूं नये असा इषारा चिठ्ठींत देण्यांत आला होता; आणि आपल्या आत्मघाताचें कारण मुद्दाम प्रसिद्ध करावें अशी सूचनाहि देण्यांत आली होती.

**सायकलींच्या निर्यातीला वाव**—कैरोमधील भारतीय वकिलातीनें केलेल्या पाहणीप्रमाणें सायप्रसमध्यें भारतामधील सायकलींच्या निर्यातीला चांगला वाव आहे. सायप्रस दरसाल २,००० सायकली आयात करते. त्यांपैकी बहुतेक ब्रिटनमधून आयात केलेल्या असतात.

## १९६०–६१ चा आर्थिक आढावा

### अन्नधान्यांचें उत्पादन घटलें

| | (दशलक्ष टन) | | |
|---|---|---|---|
| | १९५८–५९ | १९५९–६० | फरक % |
| तांदूळ ... | ३०·३० | २९·३० | – ३·३ |
| गहूं ... | ९·८० | ९·७० | – ०·४ |
| इतर धान्यें ... | २२·५० | २१·५० | – ४·४ |
| सर्व धान्यें ... | ६२·६० | ६०·५० | – ३·४ |
| डाळी ... | १२·९० | ११·३० | –१२·७ |
| सर्व अन्नधान्यें ... | ७५·५० | ७१·८० | – ५·० |

### व्यापारी पिकें : उसांत वाढ, बाकीच्यांत घट

| | १९५८–५९ | १९५९–६० | फरक |
|---|---|---|---|
| कपास (दशलक्ष गाठी) | ४·६९० | ३·८४० | –१८·२० |
| ताग (दशलक्ष गाठी) | ५·१६० | ४·५५० | –११·८० |
| गाळिताचीं धान्यें (द.ल.टन) | ६·९१० | ६·३५० | – ८·० |
| पैकी | | | |
| भुईमूग (दशलक्ष टन) | ४·८१० | ४·३९० | – ८·८ |
| गूळ व ऊंस (दशलक्ष टन) | ७·११ | ७·५८ | + ६·६ |
| इंडेक्स नंबर (१९४९–५० = १००) | १३६·७ | १३३·१ | – २·६ |

### औद्योगिक उत्पादनाचा इंडेक्स
(१९५१ = १००)

| वर्ष | इंडेक्स | पूर्वीच्या वर्षाच्या मानानें फरक % |
|---|---|---|
| १९५२ ... | १०३·६ | + ३·६ |
| १९५३ ... | १०५·६ | + १·९ |
| १९५४ ... | ११२·९ | + ६·९ |
| १९५५ ... | १२२·४ | + ८·४ |
| १९५६ ... | १३२·६ | + ८·३ |
| १९५७ ... | १३७·३ | + ३·५ |
| १९५८ ... | १३९·७ | + १·७ |
| १९५९ ... | १५१·९ | + ८·७ |
| १९६० ... | १६७·५ | + ११·७ |

### पैशाच्या पुरवठ्यांत वाढ

| | कोटी रु. | वाढीचें प्रमाण % |
|---|---|---|
| १९५६ ... | १३१ | ६·४ |
| १९५७ ... | ९६ | ४·४ |
| १९५८ ... | ७५ | ३·३ |
| १९५९ ... | १७१ | ७·३ |
| १९६० ... | २१७ | ८·७ |

### शेड्यूल्ड बँकांच्या कर्जांत मोसमी बदल
(कोटी रु.)

| | १९६०-६१ (२७-१-६१ पर्यंत) | १९५९-६० | १९५८-५९ | १९५७-५८ |
|---|---|---|---|---|
| तेजीचा मोसम | + ११५·६ | + १८८·८ | + १८१·७ | + ८९·४ |
| मंदीचा मोसम | — | – २०·३ | – ७८·९ | – ११७·९ |

### महागाईचे इंडेक्स नंबर
(१९५२–५३ = १००)

| | १९५६ | १९५७ | १९५८ | १९५९ | १९६० |
|---|---|---|---|---|---|
| अन्नपदार्थ | ९९·० | १०६·८ | ११२·० | ११८·२ | १२०·३ |
| औद्योगिक कच्चा माल | ११३·२ | ११८·१ | ११४·७ | ११९·७ | १३८·८ |
| कारखान्यांचें उत्पादन | १०४·९ | १०८·० | १०८·२ | १०९·७ | १२०·८ |
| सर्व पदार्थ | १०२·६ | १०८·७ | १११·० | ११५·५ | १२३·० |

---

### अन्नपदार्थांमधील भेसळीवर उपाय काय ?

अन्नपदार्थांत करण्यांत येणाऱ्या भेसळीचा प्रश्न गेल्या कांहीं वर्षांत चिंतेचा विषय झालेला आहे. कांहीं महिन्यांपूर्वी मोरोक्को-मधील व्यापाऱ्यांनीं खाण्याच्या तेलांत भेसळ केली व त्याचे परिणाम अक्षरशः हजारों लोकांना भोगावे लागले. भारताच्या नियोजन-समितीचे एक सभासद श्री. श्रीमन् नारायण ह्यांनीं ह्या महत्त्वाच्या प्रश्नाकडे लक्ष वेधलें आहे. नैतिक शिक्षण ह्या विषयावर ते दिल्ली येथील एका शाळेंत बोलत होते. ते म्हणाले, कीं अन्नपदार्थांत होणाऱ्या भेसळीचा प्रश्न आतां भयावह झालेला आहे. अन्नपदार्थांत भेसळ न करण्याबद्दल कायदे आहेत; परंतु त्यांची अंमलबजावणी जितक्या कडक रीतीनें व्हावयास पाहिजे तितकी होत नाहीं. ही भेसळ थांबविण्यासाठी काय करावें ह्या-विषयीं नियोजन समिति लक्षपूर्वक अभ्यास करीत आहे. ह्या प्रश्नाबाबत मध्यवर्ती सरकारच्या अन्नखात्याशीं विचारविनिमय करण्यांत येत आहे. अन्नखात्याच्या सल्लामसलतीनें अन्नपदार्थांतील भेसळ थांबविण्यासाठी एक योजना तयार करण्यांत येत आहे. अन्नपदार्थांत भेसळ करणाऱ्या गुन्हेगारांना पुन्हा असा गुन्हा करण्याची बुद्धि होऊ नये इतकी कडक शिक्षा देण्यांत आली पाहिजे. समाजांत सध्यां जें अनीतीचें वातावरण पसरलें आहे, त्याचाच अन्नपदार्थांमधील भेसळ हा एक उद्रेक आहे. ह्या कामीं चित्रपटांच्या दर्जावर नियंत्रण ठेवण्याचीहि आवश्यकता आहे. सध्यां भारतांत जे देशी अगर परदेशी चित्रपट दाखविण्यांत येतात त्यांच्यापैकीं बरेच सदभिरुचीला व नैतिकतेला पोषक नसतात. ह्यावर उपाययोजना केली पाहिजे.

---

**तंजावर येथें नमुनेदार भातशेती**—जपानी भातशेतीची शेतकऱ्यांना माहिती करून देण्यासाठी मद्रास सरकारनें तंजावर जिल्ह्यांत एक नमुनेदार भातशेत स्थापन करण्याचें ठरविलें आहे. ह्या शेतावर काम करण्यासाठी जपानचें सरकार पांच तज्ज्ञ, पाठ-विणार आहे. त्याचप्रमाणें शेतावर लागणारी यंत्रसामग्रीहि जपानच पुरविणार आहे.

# अर्थ

बुधवार, ता. ५ एप्रिल, १९६१





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## पुण्यांतील चार बँकांचें विलिनीकरण

पुण्यांतील चार महाराष्ट्रीय बँकांवर रिझर्व्ह बँकेनें मोरेटोरियमचा हुकूम २२ मार्च रोजीं बजावला आणि त्यांचे व्यवहार स्थगित करण्यांत आले. त्यांपैकी तूर्त दोन बँकांना ( भारत इं. बँक व बँक ऑफ पूना ) आपल्या ठेवीदारांना प्रत्येक व्यक्तिगत खातेदाराला ठेवीच्या १०% अगर कमाल १५० रु. परत करण्यास परवानगी दण्यांत आली आहे. मोरेटोरियमची मुदत तीन महिन्यांची, २५ जून अखेर आहे. ह्या चार बँकांपैकी भारत आणि प्रेसिडेन्सी ह्या बँका महाराष्ट्र बँकेंत सामील व्हावयाच्या असून बँक ऑफ पूना व पूना इन्व्हेस्टर्स ह्या सांगली बँकेंत समाविष्ट होण्याचे हुकूम आले आहेत.

प्रत्येक विलीन बँकेच्या येण्यादेण्याचें मूल्यमापन पुरें झाल्यावर जी परिस्थिति आढळेल, त्याप्रमाणें ठेवीदारांना त्यांच्या रकमा उपलब्ध जिंदगीचें ठेवींशीं जें प्रमाण पडेल, त्या प्रमाणांत परत देण्यांत येतील; ही परतफेड पूर्णत: अगर जेथें पूर्णत: शक्यता नसेल तेथें अंशत: होईल. ह्यासाठी संबंधित बँकांची अधिकाऱ्यांमार्फत हिशेबतपासणी चालू आहे.

लहान, प्रादेशिक बँकांच्या आवश्यकतेसंबंधीं कितीहि वक्तव्यें करण्यांत आलीं, तरी सरकारी धोरण मात्र त्यास पोषक नव्हतें आणि लहान बँकांना आज ना उद्या मोठ्या बँकांशीं संबंध जोडणें अपरिहार्य झालें असतें. ह्या दृष्टीनें, मोरेटोरियमचा प्रस्तुत हुकूम कित्येक ठेवीदारांची आज गैरसोय करणारा असला, तरी ठेवीदारवर्गाच्या अंतिम हिताचाच आहे, हें कोणासहि कबूल करावें लागेल. एकाच शहरांतील कांहीं लहान बँका बंद केल्यावर दुसऱ्या लहान बँकांनाहि त्याची झळ लागणार हें गृहीत धरूनच रिझर्व्ह बँकेनें पुण्यांतील चारहि लहान बँकांवर हुकूम बजावला असावा.

ह्या बँकांचे संबंधीं गैरसमज दूर करण्यासाठी थोडासा खुलासा करणें आवश्यक आहे. बँकांची स्थापना जबाबदार आणि समाजहितदक्ष अशा लोकांनीं केलेली आहे, परंतु त्यांचा आकार पुरेसा मोठा न झाल्याकारणानें त्यांची वाढ खुंटली होती आणि सरकारी धोरणाच्या अनिश्चिततेमुळें त्यांना धडाडीनें पुढें पाऊल टाकण्यास आवश्यक तें वातावरण नव्हतें. त्या कारणानें, परिस्थितीचे गैरफायदे तेवढे त्यांच्या वांट्यास आले. गेलीं कांहीं वर्षें त्यांच्या एकत्रीकरणाचे प्रयत्न चालू होते, त्यावरूनहि हें स्पष्ट होईल.

ह्या चारहि बँकांचा पाया म्हणजे भागीदारांनीं पुरविलेलें भाग भांडवल. त्यांचे पैसे ठेवीदारांचें सर्व देणें भागल्यावरच परतफेडीस पात्र होणार. त्यांना कांहींच मिळणार नाहीं, अशी परिस्थिति सर्व बँकांचे बाबतींत आहे, असें म्हणतां येणार नाहीं. जिंदगीचें मूल्यमापन करतांना व्यापक दृष्टिकोण ठेवण्यांत आला, जरा समजुतीनें घेण्यांत आलें, तर कांहीं बँकांच्या भागीदारांचेहि पैसे कांहीं प्रमाणांत परत मिळण्याची शक्यता आहे. असें उदार धोरण विलिनीकरण करवून घेणाऱ्या बँकांच्या चालकांनीं ठेवावें, म्हणजे त्यांचें स्वत:चें नुकसान न होतां मध्यमवर्गीय भागीदारांचेंहि हित पाहिल्यासारखें होईल; त्यांनीं महाराष्ट्रीय व्यापार–उद्दीमाच्या वाढीसाठी सत्प्रवृत्तीनें केलेल्या गुंतवणुकीचें चीज होईल. विलीन होणाऱ्या बँकांच्या कर्मचाऱ्यांची नोकरी पुढेंहि चालू राहाणार आहे, अशी तरतूद योजनेमध्यें आहे, ही समाधानाची गोष्ट आहे.

---

## जपानमधील शेतकऱ्यांकडून मार्गदर्शन

जपानी पद्धतीनें भाताची लागवड करण्याच्या पद्धतीचें प्रात्यक्षिक करून दाखविण्यासाठी जपानच्या सरकारनें आपलें कांहीं शेतकरी भारतांत पाठविण्याची तयारी दाखविली आहे. भारत सरकारनें ह्या गोष्टीला संमति दिली आहे. भातशेतीच्या चार जिल्ह्यांत ह्या पद्धतीचें शिक्षण देणारीं केंद्रें जपानी शेतकरी चालविणार आहेत. जपानी शेतकऱ्यांचा प्रवासखर्च, त्यांना लागणारीं शेतीचीं अवजारें व शिक्षणकेंद्राचा दैनंदिन खर्च जपानचें सरकार सोसणार आहे. १९५९–६० सालीं भारतांत ६५·४१ लाख एकर जमिनींत जपानी पद्धतीनें भाताची लागवड करण्यांत आली. उत्पादन ७३·०५ लाख टन झालें.

---

## पश्चिम जर्मनीचें भारताला कर्ज

पश्चिम जर्मनी भारताला, रूरकेला पोलाद कारखान्याच्या विस्तारयोजनेसाठी २३ कोटी मार्क्सचें कर्ज देणार आहे. एकूण ४० कोटी मार्क्स पश्चिम जर्मनी भारतास कर्ज देऊं इच्छित असून त्यांचा पहिला हप्ता वर म्हटल्याप्रमाणें मिळणार आहे. बाकीची रक्कम मागाहून दिली जाईल.

---

## घरें बांधण्यासाठी कर्जाऊ रकमा

मध्यवर्ती सरकारच्या ज्या नोकरांना दरमहा २०० रुपयांपेक्षा कमी पगार असेल त्यांना जास्तींतजास्त रु. ४,८०० इतकी रक्कम घरबांधणीसाठी कर्जाऊ देण्याची परवानगी मध्यवर्ती सरकारनें खातें-प्रमुखांना दिली आहे. दुसऱ्या पगार-चौकशी-मंडळानें केलेल्या शिफारशीला अनुलक्षून हा निर्णय घेण्यांत आला आहे.

---

## केरळ बँकांचा मोरिटोरियम वाढला

त्रावणकोर फॉरवर्ड बँक, कोट्टायम ओरिअंट बँक, सिसिआ मिड्लंड बँक, बँक ऑफ न्यू इंडिया आणि वेनट् बँक, ह्या केरळांतील पांच बँकांचा मोरेटोरियम १८ मार्च रोजीं संपणार होता, तो आणखी दोन महिन्यांनीं वाढविण्यांत आला आहे.

---

## अशोक हॉटेलनें अर्धा कोटि रु. खाल्ले

अशोक हॉटेल लि. ला मार्च, १९५९ अखेर ५६ लक्ष रु. तोटा झाला असून त्यामुळें वसूल भांडवलापैकी ५५% भांडवल नष्ट झालें आहे. दिल्ली येथें १९५६ मध्यें युनेस्कोचें अधिवेशन झालें, त्यावेळीं हें हॉटेल उभारण्याची सरकारला घिसाडघाई करावी लागली.

## अग्निबाणांचा प्रवासासाठी उपयोग

अग्निबाणांचा उपयोग करून एका खंडांतून दुसऱ्या खंडांत हा हा म्हणतां प्रवास करण्याची शक्यता आहे, असें एका रशिअन शास्त्रज्ञाचें मत आहे. हल्लीं जेट विमानाच्या साह्यानें होणारा खंडांतर्गत प्रवास कांहीं कमी वेगाचा नाहीं. पण वेगानें प्रवास करण्याचीं साधनें शोधण्याच्या कामीं जगांतील शास्त्रज्ञांची अजूनहि स्पर्धा चालू आहेच. अग्निबाणांच्या साह्यानें चंद्रावर व इतर ग्रहांवर जाण्याची शास्त्रज्ञांची खटपट चालू असतां पृथ्वीवरील प्रवासासाठी त्यांचा उपयोग करण्याची कल्पना सुचणें साहजिक आहे. वरील रशिअन शास्त्रज्ञाच्या मतानें टप्प्याटप्प्यानें नियंत्रित स्फोट होणाऱ्या अग्निबाणाच्या साह्यानें मॉस्को ते न्यूयॉर्क हा प्रवास अवघ्या ३० मिनिटांत करतां येईल. अद्यापि शास्त्रज्ञांच्या कल्पनेंतच असलेलें हें अग्निबाणयान ६ भागांचें असेल. आपल्या तळावरून सुटल्यावर तें प्रथम पृथ्वीशीं काटकोन करून वरती जाईल. पृथ्वीभोंवतीं असलेल्या वातावरणाच्या दाट थरांतून झपाट्यानें वर जाणें एवढेंच त्याचें पहिलें साध्य असेल. बरेंच उंच गेल्यावर मग अग्निबाण आपल्या प्रस्थानाच्या दिशेनें गति घेईल. प्रवासाच्या पहिल्या टप्प्यांत त्याची गति एका सेकंदाला ३ किलोमीटर्स असेल. त्यानंतर अग्निबाणाचा पहिला भाग गळून पडेल व प्रवासाच्या दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्याला प्रारंभ होईल. २७० किलोमीटर उंचीवर गेल्यावर अग्निबाणांतील एंजिनें बंद होतील; पण तें पहिल्याच दिशेनें मार्ग आक्रमीत राहील. अग्निबाणाची गति ६.७ किलोमीटर झाल्यावर तीन मिनिटांच्या अवधींत त्याची गति कमी करण्याची क्रिया आपोआप सुरू होईल व तें संकल्पित तळावर सुलभतेनें उतरूं शकेल.

## लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनचा वाढता व्यवसाय

१९६० मध्यें ४५९.९९ कोटी रुपयांचा नवीन व्यवसाय पूर्ण करून कॉर्पोरेशननें एक नवा उच्चांक प्रस्थापित केला आहे. १९५९ मधील व्यवसायापेक्षा हा व्यवसाय १५.४ टक्क्यांनीं अधिक झाला आहे. भारतांतील ४८४.४७ कोटी, परदेशांतील ९.७० कोटी व जनता पॉलिसी खालील १.८२ कोटी रुपयांचा व्यवसाय याचाच फक्त अंतर्भाव येथें करण्यांत आला आहे; वर्षासनांची रक्कम त्यांत धरलेली नाहीं.

१९६३ मध्यें १,००० कोटींचा व्यवसाय करण्याचें कॉर्पोरेशननें उद्दिष्ट ठेविलें आहे. एकूण मिळविलेल्या व्यवसायाच्या दृष्टीनें दक्षिण झोनचा प्रथम क्रमांक लागतो. त्या झोननें १२२.८५ कोटी रुपयांचा व्यवसाय पूर्ण केला. पश्चिम झोनचा, ज्यांत महाराष्ट्र व गुजरात राज्यें येतात, दुसरा क्रमांक लागतो. पुढील तक्त्यावरून प्रत्येक झोनच्या व्यवसायाचें प्रमाण कळेल.

| झोन | पॉलिसीची संख्या | विम्याची रक्कम (कोटी रु.) |
|---|---|---|
| उत्तर ... | १,५२,११४ | ७९.९२ |
| मध्य ... | १,५७,९४८ | ६३.५० |
| पूर्व ... | २,९०,९३६ | १११.७४ |
| दक्षिण ... | ३,५२,१७६ | १२२.८५ |
| पश्चिम ... | २,७२,१४४ | ११३.४६ |
| परदेश ... | ७,७३६ | ९.७० |
| एकूण | १२,३३,०५४ | ४९४.१७ |


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

रजिस्टर्ड ऑफिस : ११७७, बुधवार पेठ, पुणें शहर

—: भांडवल :—

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | ... ... | रु. ३५,००,००० चे वर |
| गंगाजळी व इतर निधि | ... | रु. १७,१०,००० |
| खेळतें भांडवल | ... | रु. १५ कोटींचे वर |

★ महाराष्ट्र, आंध्र आणि म्हैसूर राज्यांत मिळून बँकेच्या ५२ शाखा

★ सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

★ स्टर्लिंग व डॉलर करन्सीमधील प्रवासी चेक्स विकत मिळतात

★ परदेशी लेटर्स ऑफ क्रेडिट उघडलीं जातात

— २७ मार्च, १९६१ पासून सुरू झालेल्या १४ नव्या शाखा —

अर्वी, चांदा, धामणगांव, दुर्ग (मध्यप्रदेश), गोंदिया, हिंगणघाट, पुलगांव, राजनांदगांव (मध्यप्रदेश)- वर्धा, वरोरा, वणी, नागपूर (१ सिताबर्डी, २ धर्मपेठ, ३ इतवारी)

इतर प्रमुख देशांतहि एजन्सीजची सोय आहे.

जनरल मॅनेजर

## नैसर्गिक रबराला कृत्रिम रबराची स्पर्धा

मलायामधील रबर प्रोड्यूसर्स कौन्सिल ह्या संस्थेनें रबराच्या धंद्याशीं संबंध असणाऱ्यांना धोक्याचा इषारा दिला आहे. कौन्सिलनें १९६० सालचा आपला अहवाल प्रसिद्ध केला आहे. अहवालांत असें म्हटलें आहे कीं, नैसर्गिक रबराच्या उत्पादकांना दिवसांनुदिवस अधिक अडचणींचा काळ येणार आहे. कारण, कृत्रिम रबराचें उत्पादन वाढत असून त्याची स्पर्धा नैसर्गिक रबराशीं होत चालली आहे. ह्या बाबतींत मलायाच्या सरकारनें लक्ष घालणें आतां अपरिहार्य झालें आहे. रबराच्या झाडांची नव्यानें लागवड करण्याची मोहीम हातीं घेण्यांत आली पाहिजे; तरच नैसर्गिक रबराच्या उत्पादनाचा खर्च कमी करतां येईल व तें स्पर्धेत टिकू शकेल. मलाया हा जगांतील रबराच्या उत्पादनाच्या बाबतींत पहिल्या क्रमांकाचा देश आहे. जगांतील रबराच्या एकूण उत्पादनापैकीं ३४ टक्के अथवा ७,००,००० टन रबर मलायामधील मळ्यांतून पैदा होतें. मलायाच्या रबराला अमेरिकेकडून सर्वांत मोठा धोका उत्पन्न झाला आहे. दहा वर्षांपूर्वी अमेरिकेंत रबराच्या एकूण खपापैकीं ४२ टक्के रबर कृत्रिम बनावटीचें वापरण्यांत येत असे. आतां हें प्रमाण ६८ टक्क्यापर्यंत वाढलें आहे. १९५९ सालीं मलायामधील ३५ लाख एकर जमिनींत रबराची लागवड करण्यांत आली होती. ह्यापैकीं २० लाख एकर जमिनींत लागवड छोट्या मळेवाल्यांनीं केलेली होती. हे सर्व मळे विस्तारानें १०० एकरांपेक्षा कमी होते. ह्या लहान मळ्यांतून नवीन झाडांची लागवड करणें अवघड असतें. म्हणून रबराच्या झाडाची नव्यानें लागवड करण्यासाठी छोट्या मळेवाल्यांना खास मदत देण्याची शिफारस करण्यांत आली आहे.

---

## निर्यात वाढविण्याचें काम धंदेवाइकांकडे सोंपविणार ?

कलकत्ता येथील इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संस्थेच्या जागतिक व्यापार खात्याच्या सभेंत भारताचे व्यापारमंत्री श्री. नित्यानंद कानुगो ह्यांचें भाषण झालें. भारताच्या औद्योगिक विकासासाठी लागणाऱ्या भांडवली मालाची आयात करण्यासाठी आणखी कांहीं वर्षें तरी निर्यात वाढविणें अगत्याचें आहे असें सांगून ते आपल्या भाषणांत पुढें म्हणाले कीं, निर्यात वाढविण्याचें काम देशांतील धंदेवाइकांच्या पुढाऱ्यांकडे सोंपविण्याच्या प्रश्नाचा सरकार विचार करीत आहे. निर्यात व्यापार वाढविण्याचें काम सरकारला झेपण्यासारखें नाहीं. कारण, ह्याबाबतींत खाजगी व्यापारी संस्थांना जितका अनुभव आहे तितका सरकारला नाहीं. निर्यात व्यापार अशा व्यापारी संस्थांकडे सोंपविण्यांत आल्यास हें पाऊल म्हणजे त्यांना एक आव्हानच ठरणार आहे. एक–दोन महिन्यांच्या आंतच सरकार संबंधित व्यापारी संस्थांच्या पुढाऱ्यांची एक बैठक बोलावणार आहे. भारतानें परदेशीय चलन मिळवीत राहिलें पाहिजे, नाहींतर बाका प्रसंग ओढवल्याशिवाय राहणार नाहीं. निर्यात वाढविण्यासाठी सरकार आपल्याकडून होईल तितकें साह्य देईलच. पण अखेर खाजगी व्यापाऱ्यांच्या साहसावर व चिकाटीवरच यश अवलंबून आहे. इतर देशांतील व्यापारवृद्धीच्या बाबतींत हेंच खरें ठरलें आहे; आणि भारताच्या बाबतींतहि तें खरें ठरेल असा भरंवसा वाटतो. औद्योगीकरणाच्या बाबतींत भारतानें जपानचा व जर्मनीचा कित्ता आपल्या डोळ्यांसमोर ठेवावा. दुसऱ्या महायुद्धांत झालेल्या सर्व नाशानंतर त्यांनीं पुन्हां पहिल्यापासून सुरुवात करून सुसंपन्नता प्राप्त करून घेतली.

---

## खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांची स्पृहणीय प्रगति

भारत सरकारचे उपव्यापारमंत्री श्री. सतीशचंद्र ह्यांनीं कलकत्ता येथें बोलतांना असे उद्गार काढले कीं, हिंदमधील खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांची गेल्या १० वर्षांत अतिशय वेगानें प्रगति झालेली आहे. गेल्या १५० वर्षांच्या अवधींत इतक्या वेगानें ह्या उद्योगधंद्यांची प्रगति कधींच झालेली नाहीं. ही घटना लक्षांत भरण्यासारखी आहे. कांहीं लोक भारतामधील अर्थव्यवस्थेला मिश्र अर्थव्यवस्था न म्हणतां 'मार्गदर्शित अर्थव्यवस्था' म्हणतात. नांव कोणतेंहि दिलें तरी खाजगी उद्योगधंद्यांची झालेली वाढ स्पृहणीय आहे ह्यांत शंका नाहीं. अलीकडे खाजगी मालकीचा विभाग व सार्वजनिक मालकीचा विभाग, ह्या हिंदच्या अर्थव्यवस्थेमधील दोन विभागांत स्पर्धा असल्याचें सांगण्यांत येत आहे. हा वादविवाद खरोखर अस्थानी आहे. अनुभव मात्र असा आहे कीं, प्रथम खाजगी मालकीच्या विभागाकडून सरकारच्या कांहीं धोरणावर हल्ला चढविण्यांत येतो; आणि सरकारनें आपल्या संरक्षणासाठी कांहीं उपाय योजले की हाच विभाग कुरकुरूं लागतो. खाजगी मालकीच्या विभागांतील उद्योगपती अगर व्यापारी ह्यांच्यावर सरकारचा अविश्वास आहे असें समजण्याचें कारण नाहीं; उलट, त्यांच्या सहकार्याची सरकारला आवश्यकता आहे. उद्योगपतींवर उत्पादन वाढविण्याची व कार्यक्षमता उच्च पातळीवर नेण्याची जबाबदारी आहे. ह्या बाबतींत त्यांनींच पुढाकार घेतला पाहिजे. उत्पादन व कार्यक्षमता वाढल्याशिवाय परदेशीय चलन मिळवींत राहणें जमणार नाहीं. भांडवली मालाच्या आयातीसाठी कांहीं काळ परदेशांकडून मिळणाऱ्या कर्जावर अवलंबून राहणें नाइलाज म्हणून चालेल. पण, भांडवली मालाचा वापर करण्यासाठी लागणाऱ्या आयातीसाठी निर्यातीच्या उत्पन्नावरच भार दिला पाहिजे.

---

## पतियाळा फिरती बक बंद केली

बॅंक ऑफ पतिआळानें १० वर्षांपूर्वी "बॅंक ऑन व्हील्स" म्हणजे फिरत्या मोटारीची बॅंक सुरू केली होती. ह्या मोटारीच्या खिडक्या बंदुकीच्या गोळ्यांना दाद न देणाऱ्या होत्या. मोटारीला १ लक्ष रु. खर्च आला होता. आठवड्यांतून एकदा ती ठराविक खेडेगांवाला भेट देत असे आणि खेडुतांची त्यामुळें सोय होई. पण, ही योजना बॅंकेला परवडत नसल्यामुळें, ती आतां बंद करण्यांत आली आहे. १० वर्षांपूर्वी, त्यावेळचे अर्थमंत्रि श्री. चिंतामणराव देशमुख, ह्यांनीं ह्या फिरत्या बॅंकेचें उद्घाटन केलें होतें. बॅंक ऑफ पतिआळा आतां सरकारी मालकीची बॅंक आहे.

---

## मुंबई, पुणें व ठाणें स्थानिक स्वराज्य संस्था

बृहन्मुंबई, पुणें आणि ठाणें म्युनिसिपल हद्दींत वसूल होणारा अर्बन इम्मुव्हेबल प्रापर्टी टॅक्स १९६१–६२ पासून त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हवालीं केला जाईल. त्यांच्या वसुलीचे आंकडे खालीलप्रमाणें आहेत:—

| | |
|---|---|
| बृहन्मुंबई | १,१०,००,००० रु. |
| मुंबई उपनगर | २०,००,००० रु. |
| पुणें शहर व कॅंटोन्मेंट | १०,००,००० रु. |
| ठाणें | २,००,००० रु. |

### साखरेच्या निर्यातीच्या मार्गातील अडचणी

अमेरिकेचे भारतामधील माजी वकील मि. एल्सवर्थ बंकर मुंबई येथें त्यांच्या सत्कारार्थ योजण्यांत आलेल्या एका समारंभ-प्रसंगीं म्हणाले कीं, अमेरिकन काँग्रेसनें नवा कायदा केल्याशिवाय भारताची साखर अमेरिकेंत निर्यात करण्याची फारशी शक्यता दिसत नाहीं. अमेरिकन काँग्रेस संबंधित कायद्यांत बदल करणारच नाहीं असें मात्र नाहीं. अमेरिकेला निर्यात करण्यांत येणाऱ्या साखरेचे देशवार हिस्से इंटरनॅशनल शुगर अग्रिमेंटप्रमाणें ठरतात. ह्या करारांत भारत सहभागी नाहीं. ह्या कराराप्रमाणें क्यूबांतील साखर साखरेच्या जागतिक किंमतीपेक्षा ६० ते ६५ टक्के अधिक किंमत देऊन अमेरिका घेत असे. भारत निर्यातींत हिस्सा मागू लागल्यापासून करारांतील इतर सहभागी देशहि अधिक किंमतीची मागणी करू लागले आहेत.

### दुधाच्या पदार्थांचा संकल्पित कारखाना

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत मद्रास सरकार दुधाची भुकटी व लोणी तयार करण्याचा एक कारखाना काढण्याचा विचार करीत आहे. ह्या कारखान्यासाठी १५ लाख रुपये भांडवल लागणार आहे. कारखान्याची जागा अद्याप ठरलेली नाहीं. ग्रामीण भागांतील सहकारी दूधपुरवठा केंद्रांना कर्जे देण्याची ठाम योजनाहि सरकारनें आंखली आहे.

### गुजरात राज्यांतील रस्त्यांची वाढ

ग्रामीण भागांतील पक्क्या रस्त्यांची वाढ करण्याचा कार्यक्रम गुजरात सरकारनें आंखला आहे. त्याच्या अंमलबजावणीसाठी ८ लाख रुपये खर्च येणार आहे. एकूण खर्चापैकी ४ लाख रुपये मध्यवर्ती सरकार देणार आहे, २ लाख रुपये राज्य सरकार देणार आहे आणि बाकीचे २ लाख स्थानिक स्वराज्य संस्थांनीं द्यावयाचे आहेत. रस्ते बांधून झाल्यावर १० वर्षेपर्यंत ते चांगल्या स्थितींत राखण्याची जबाबदारी जिल्हा बोर्डांवर व पंचायतींवर टाकण्यांत आलेली आहे.

### आंध्र राज्याच्या किनाऱ्यावरील छोटीं बंदरें

आंध्र राज्याला ६०० मैल लांबीचा समुद्रकिनारा आहे. ह्या किनाऱ्यावरील छोट्या बंदरांचा विकास करण्याची सूचना करण्यांत आली आहे. राज्यांतील रेल्वे व रस्ते अपुरे असल्यामुळें औद्योगिक कच्चा माल आणण्यासाठी छोट्या बंदरांचा उपयोग करण्यांत यावा असें सुचविण्यांत आलें आहे. विशाखापट्टम् येथें कांडलाप्रमाणेंच एक मुक्त व्यापार-प्रदेश निर्माण करण्यांत यावा अशीहि सूचना करण्यांत आली आहे.

### औषधी गोळ्यांनीं संततिनियमनाची शक्यता

"संततिनियमनाच्या औषधी गोळ्यांचा सार्वत्रिक प्रसार करण्याइतपत त्यांची विश्वासार्हता सिद्ध झालेली नाहीं" असें मत त्या बाबतींत सल्ला देण्यासाठी सरकारनें नेमलेल्या समितीनें व्यक्त केलें आहे. कलकत्ता येथील ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ हायजीन अँड पब्लिक हेल्थ येथील प्रयोगावरून आढळून आलें, कीं ह्या गोळ्या खाल्ल्यामुळें गर्भधारणेचा संभव ५०% कमी होतो. ज्यांचेवर ह्या गोळ्यांचा प्रयोग करण्यांत आला, त्यांचेवर कांहीं विपरीत परिणाम झाल्याचें अद्याप आढळलेलें नाहीं. औषधी गोळ्यांवर आणखी संशोधन चालू आहे.


नेहमींच प्रगतिपर व सुरक्षित

## दि बेळगांव बँक लिमिटेड

बेळगांव

(शेड्यूल्ड बँक)

स्थापना १९३०

★ नियमित बचत केल्यानें कुटुंबाची व राष्ट्राची शक्ति वाढीस लागते.

★ कुटुंबांतील मंगलकार्यें, उच्चशिक्षण किंवा घरबांधणी हीं मोठ्या खर्चाचीं कामें पार पाडण्यासाठी नियमित बचत करणें अगत्याचें ठरतें.

★ बेळगांव बँकेंत क्युम्युलेटिव्ह डिपॉझिटचें वा होम-सेव्हिंग्जचें खातें उघडून आपणांस ही तरतूद योग्य रीतीनें करतां येते.

व्याजाचे आकर्षक दर.

आपल्या सव्वीस शाखांतून सेवावृत्तीनें व्यापार व बचत यांची नेहमींच वाढ करीत असलेली

दि बेळगांव बँक लिमिटेड.

एच्. एस्. कुलकर्णी

जनरल मॅनेजर



स्थापना १९३६

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.

शाखा—१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई-गिरगांव, ३ मुंबई-दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नासिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. हलकर्णी, ११. इचलकरंजी, १२. फलटण, १३. अकलूज.

| | | ३१ डिसेंबर, १९६० |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ५,०२,००० |
| ठेवी | रु. | २,२५००,०३० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | २,९९,००,००० |

ठेवींवरील नवीन व आकर्षक व्याजाचे दर

१. चालू खातें ०-५० २. सेव्हिंग्ज बँक २-५०

३. स्पेशल सेव्हिंग्ज डिपॉझिट ३-०३

मुदत ठेवी—१ वर्ष ३-०० २ वर्षें ३-२५

३ वर्षें ३-७५ ५ वर्षें ४-००

रुपये एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात.

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., *जनरल मॅनेजर.*

शं. ह. साठे, बी. ए., एल्एल्. बी., *चेअरमन.*

### आंध्रमध्यें चिनी भातशेती अयशस्वी ?

आंध्रमध्यें चिनी पद्धतीनें भातशेतीचे करण्यांत आलेले प्रयोग अयशस्वी झाले असल्याचें शेतकी मंत्र्यांनीं स्पष्ट केलें आहे. राज्यांतील चार भात–संशोधन–केंद्रांत प्रयोग करण्यांत आले असतां, शेतीचा खर्च वाढून पीक मात्र त्यामानानें कमी येत असल्याचें सिद्ध झालें आहे. आजवर ३४ प्रयोग झाले. हे प्रयोग यापुढें बंद करण्यांत येणार आहेत. चिनी पद्धतीनुसार या केंद्रांतील भाताचें एकरीं उत्पादन २,२८९ आणि २,५५४ पौंड या दरम्यान कुठेंतरी असतें, तर इतर पद्धतीनें होणारें एकरीं उत्पादन ३,६९० ते ४,८४९ पौंड असतें.

### १० शिलिंगांचा पौंड ?

ब्रिटिश सरकार आपलें चलन दशमान पद्धतींत बसविण्याच्या विचारांत आहे, पण १० शिलिंगांचा पौंड करण्याला तें घाबरत आहे. १० शिलिंगांचा पौंड केला, म्हणजे पौंडाचें अवमूल्यन झालें, असा समज होण्याचा संभव आहे ! चलनाच्या किंमती-मध्यें स्थिरता असण्याला केवढें मोठें महत्त्व दिलें जातें, हें ह्यावरून लक्षांत येईल.

### वीर वंशजांस भत्ते

१८५७ च्या समरांत भाग घेतलेल्या शूरांच्या वंशजांच्यापैकी सतरा असामींना भत्ते दिले जातात. ही रक्कम दरमहा रुपये २५ पासून रु.२५० पर्यंत असते. यांत सर्वश्री नारायणराव टोपे, रघुनाथ टोपे, शंकरराव टोपे ही मंडळी आहेत.

### इंग्लंडमधील बँकेवर दरोडा

केंब्रिज ( इंग्लंड ) येथील बार्कलेज बँकेवर २१ मार्च रोजीं रात्रीं दरोडा पडला आणि दरोडेखोरांनीं ७०,००० पौंड किंम-तीच्या नोटा व नाणीं लांबविलीं.

### लक्स साबण आतां चार रंगांत निघणार

हिंदुस्थान लिव्हर लि. नें लक्स साबण आतां चार रंगांत बनविण्यास प्रारंभ केला आहे. कंपनीनें क्रिकेट क्लब ऑफ इंडियामध्यें निमंत्रितांना मेजवानी देऊन हा उपक्रम जाहीर केला. इंडियन मोशन पिक्चर प्रोड्यूसर्स असोसिएशनचे अध्यक्ष, श्री. विमल रॉय, हे मुख्य पाहुणे होते. कंपनी प्रचारासाठी चित्र-पटाच्या माध्यमाचा उपयोग करून त्यांत कांहीं चित्रतारकांना वाव देते, ह्याबद्दल त्यांनीं कंपनीला धन्यवाद दिले.


### सेंट्रल बँकांच्या गव्हर्नरांची परिषद्

एप्रिलच्या पहिल्या आठवड्यांत टोकियो येथें मध्यवर्ती बँकांच्या गव्हर्नरांची परिषद् भरत आहे, त्याला सहा आशिआई दश आपले बँक–प्रतिनिधी पाठविणार आहेत. भारताचे श्री. अयंगार ( रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर ) परिषदेला उपस्थित आहेत.

### विम्याच्या स्वरूपांत बोनस

उंझा फॉर्माम्युटिकल कंपनीनें मजूर महाजनांच्या संमतीनें, प्रत्येक कामगाराला १,००० रु. च्या विम्याच्या स्वरूपांत बोनस देण्यास प्रारंभ केला आहे. हसे कंपनी भरील.

५०
वर्षापेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान
★ सरदारगृह ★
प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.



आज बाजारात अनेक ब्राम्ही तेलें उपलब्ध आहेत; परंतु ब्राम्ही तेलाच्या मूळ कल्पनेचें श्रेय सांडू बंधूनाच द्यावें लागेल. सांडू बंधूंच्या आयुर्वेदावरील प्राचीन ग्रंथांच्या गाढ्या व्यासंगाचें तें फळ आहे. ह्या ग्रंथांतून 'ब्राम्ही' या अल्पमोली परंतु बहुगुणी वनस्पतीचा, मेंदूच्या अगर उष्णतेच्या विकारांवर उपयोग सांगितला आहे. त्यावरूनच श्री. दत्तात्रेय कृष्ण सांडू यांना ब्राम्ही वनस्पती-युक्त तेल करण्याची कल्पना सुचली. औषधी म्हणून अथवा एरव्हीं सुगंधी तेल म्हणून लावण्यास उपयोगी पडणारें बहुगुणी तेल तयार करण्यासाठीं त्यांनीं प्रयोग सुरू केले व भारतांत प्रथमच "ओरिजिनल ब्राम्ही तेल" तयार करून तें लोकप्रिय केलें.

आर्य-वैद्यकाच्या इतिहासांतील महत्वाचें पान




(१८९९-१९६०)

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर प्रा. लि. चेंबूर-मुंबई ७१

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर प्रायव्हेट लि. हीरक महोत्सव

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.




बेडेकर
मसाले, लोणची व पापड
आपल्या जेवणांत विशेष लज्जत आणतील
वापरून पहा.
कुंभारवाडा. मुंबई ४.
शाखा: ठाकुरद्वार, दादर, कोट व परळ.

## कंपन्यांनीं काढावयाच्या कर्जावर मर्यादा

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत ज्या नव्या कंपन्या काढण्यांत येतील त्यांच्या कर्ज काढण्याच्या अधिकारावर मर्यादा घालण्याचा विचार मध्यवर्ती सरकार करीत आहे. सरकारच्या मतें ह्या कंपन्यांनीं अधिकांत अधिक प्रमाणांत सामान्य भागांचें भांडवल गोळा करावें आणि कर्जें काढण्यावर वाजवीपेक्षा अधिक जोर देऊं नये. भाग भांडवलाच्या दुपटीपेक्षा अधिक कर्ज असूं नये असें ठरविण्यांत येण्याची शक्यता आहे. ह्याचा अर्थ असा कीं कंपन्यांच्या एकूण भांडवलाच्या ६६ टक्क्यांपेक्षा अधिक पैसा कोणत्याहि कंपनीला कर्ज म्हणून घेतां येणार नाहीं. भांडवलाच्या बाजाराची सध्यांची परिस्थिति लक्षांत घेता भांडवलाच्या रूपांतील पैसा आणि कर्जाच्या रूपांतील पैसा ह्याच्या प्रमाणांत समतोलपणा असावा असें मत बऱ्याच ठिकाणीं व्यक्त करण्यांत येत आहे. आज भांडवलाच्या बाजारांत सामान्य भाग भांडवलांत पैसे गुंतविण्याची प्रवृत्ति चांगली वाढीस लागलेली दिसते. उलट, बँकिंगच्या व्यवसायांत कर्जें दुर्मिळ होण्याची प्रवृत्ति वाढत आहे. गेल्या कांहीं महिन्यांत बँकांजवळील तरत्या पैशांत घट झालेली आहे. व्यापार व उद्योगधंदे ह्यांत गुंतलेल्या धंदेवाईकांकडून अल्प-मुदतीचीं कर्जें मिळण्याची मागणी आली व ती बँकांनीं पुरविली. त्यामुळें बँकांवर आपत्ति आली असें म्हणतात. उद्योगधंद्यांना लागणारा पैसा अशा रीतीनें कितीसा पुरविता येईल ही एक शंकाच आहे. उद्योगधंद्यांना लागणारें भांडवल बँकांनीं कर्जाच्या रूपांत पुरविल्यामुळें बँका अडचणींत आल्या. अल्प मुदतीच्या कर्जाची गरज तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत अधिकच वाढेल. अशा वेळीं कंपन्यांनीं काढावयाच्या कर्जावर मर्यादा हवी, असें सरकारच्या कायदा खात्याचें मत आहे.

## राजस्थानमधील कालव्याचें महत्त्व

राजस्थानमधून काढण्यांत येणाऱ्या कालव्याचे काम तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस पूर्ण होईल. तें पूर्ण झाल्यावर सुमारें ८० लाख एकर वालुकामय रेताड जमिनीला त्याचा फायदा मिळेल. कालवा राजस्थानच्या ज्या भागांतून जातो तो भाग नेहमींच दुष्काळी असतो. कारण, तेथें पावसाचें प्रमाण फार कमी आहे. मुख्य कालव्याची लांबी ४२५ मैल होईल. त्यामधील पाणी झिरपू नये म्हणून सिमेंटचा वापर करण्यांत येणार आहे. हा कालवा नंतर कांडला बंदराला जोडण्यांत येणार आहे. मग त्याची लांबी ९०० मैल होईल. कालवा व त्याचे जोड-कालवे पूर्ण झाले म्हणजे २५ लाख टन अधिक अन्नधान्य निर्माण करता येईल.

### चहाचे प्रमुख उत्पादक देश

| | एकूण उत्पादन (दशलक्ष टन) १९६० | १९५९ |
|---|---|---|
| उत्तर भारत ... | ५२७·१ | ५६१·२ |
| द. भारत ... | १६७·२ | १५३·३ |
| पाकिस्तान ... | ४१·८ | ५६·७ |
| सिलोन ... | ४३४·७ | ४१३·१ |
| इंडोनेशिया ... | ८१·७ | ७७·५ |
| न्यासालँड ... | २६·१ | २३·२ |
| ब्रि. ई. आफ्रिका ... | ४८·९ | ४५·८ |
| पोर्तुगीज ई. आफ्रिका ... | १६·५ | १५·५ |
| | १,३४४·० | १,३४६·४ |

**लष्करी शाळेला देणगी**—महाराष्ट्र सरकारनें सातारा येथें एक लष्करी शिक्षणाची शाळा उघडण्याचें ठरविलें आहे. ह्या शाळेंत खडकवासला येथील लष्करी संस्थेंत प्रवेश मिळवूं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना प्राथमिक स्वरूपाचें शिक्षण देण्यांत येणार आहे. सातारा येथील शाळेसाठी श्रीमती मालती डहाणूकर ट्रस्ट तर्फे श्री. डी. एम्. डहाणूकर ह्यांनीं २ लाख रुपयांची देणगी दिली आहे. मुख्य मंत्री ह्यांना ह्या रकमेचा चेक देण्यांत आला.

**ग्रंथकर्त्यांची सूची**—भारत सरकारच्या साहित्य ॲकॅडमीनें ग्रंथकर्त्यांची माहिती देणारी एक सूची प्रकाशित केली आहे. ह्या सूचींत ५,५०० हिंदी ग्रंथकारांविषयीं माहिती देण्यांत आली आहे. अशा प्रकारचें हें पहिलेंच प्रकाशन आहे. ज्या हिंदी ग्रंथकारांनीं भारतामधील कोणत्याहि सरकारमान्य भाषेंत अगर इंग्रजींत एक किंवा अधिक पुस्तकें लिहिलीं असतील अशांचीं नांवें सूचींत समाविष्ट करण्यांत आलीं आहेत.

**शास्त्र प्रवीण, तंत्र प्रवीण, ह्यांची नोंद**—शास्त्रीय अगर तांत्रिक लायकी असणाऱ्यांचें एक राष्ट्रीय रजिस्टर करण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. गेल्या महिन्याच्या मध्यापर्यंत अशा प्रकारचे परदेशीय दाखले असणाऱ्या ४,९४५ लोकांनीं आपलीं नांवें नोंदविलीं आहेत. ह्या लोकांच्या नांवांची यादी खाजगी व सार्वजनिक मालकीच्या औद्योगिक संस्थांकडे पाठविण्यांत येते.

**सौराष्ट्रामधील विमानतळ**—सौराष्ट्रामधील चार विमानतळ मोठ्या विमानांना उतरण्यास सोईचे करण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. ह्या कामासाठी सरकारनें ६ लाख रुपये मंजूर केले आहेत. इंडिअन एअरलाइन्स कंपनीनें अधिक मोठीं विमानें वापरण्याचें ठरविल्यामुळें विमानतळांचा विकास करणें प्राप्त झालें.

**भारतासाठी कॅनेडिअन भांडवल**—कॅनडामधील शिलकी भांडवल भारतांत गुंतविण्यांत यावें अशी सूचना कॅनडामधील भारताच्या हायकमिशनरांनीं केली आहे. त्यांच्या मतानें भारताची अर्थव्यवस्था आतां स्वयंपूर्ण होण्याच्या बेतांत आहे. भारतामधील लोकांची खरेदीची शक्ति वाढत आहे; रोजगारहि अधिक प्रमाणांत उतलब्ध होत आहेत. त्यामुळें परदेशी भांडवलाला भारतांत खूप वाव आहे, असें त्यांचें म्हणणें आहे.

**भारताला हंगेरीचें कर्ज**—भारतांत अनेक प्रकारचे उद्योगधंदे काढण्यासाठीं मदत म्हणून हंगेरीनें ८ कोटी रुपयांचें कर्ज देण्याची तयारी दाखविली आहे. ह्या कर्जावर २·५ टक्के व्याज घेण्यांत येणार असून त्याची फेड ८ ते ९ वर्षांत करावयाची आहे. भारताकडून माल घेऊन कर्जाची फेड करून घेण्याची हंगेरीची तयारी आहे. भारत हंगेरीला लोखंडाचें खनिज, वनस्पति तेले, अभ्रक, चहा, कॉफी, ताग, लाख, इत्यादि माल देऊ शकेल.

**चीनमध्यें व्यवसाय करणारे हिंदी डॉक्टर्स**—कॅंटनमध्यें गेलीं कित्येक वर्षें डॉक्टरीचा व्यवसाय करणारे डॉ. एस्. के. चक्रवर्ती चीन सोडून आतां हाँगकाँगला स्थायिक झाले आहेत. त्यांनीं एका चिनी स्त्रीशीं विवाह केलेला आहे. त्याशिवाय डॉ. पेटिगारा हे हिंदी डॉक्टरहि हाँगकाँगला येऊन स्थायिक होणार आहेत. डॉ. पेटिगारा गेलीं ४० वर्षें पेकिंगमध्यें व्यवसाय करीत आहेत. त्यांनींहि चिनी स्त्रीशींच विवाह केला आहे. पेकिंगमधील परदेशीय राजदूत व त्यांचीं कुटुंबें ह्यांच्यांत डॉ. पेटिगारा विशेष लोकप्रिय होते. डॉक्टरीच्या व्यवसायांत अडचणी येऊं लागल्यामुळें दोघांनाहि चीन सोडावा लागला असें म्हणतात.

## बँकांवरील वाढते हल्ले : प्रतिबंधक उपाययोजना

" आमच्या शाखा, नोकरवर्ग, कामासाठी येणारे नागरीक, ह्यांच्यावर करण्यांत आलेल्या हल्ल्यांमुळें काळजी वाटूं लागली आहे. यशस्वी हल्ल्यांना वृत्तपत्रांतून प्रसिद्धि मिळते, पण यशस्वी हल्ल्यांच्या मानानें अयशस्वी हल्लेच कितीतरी अधिक असतात ! आमच्या शाखांवर व नोकरवर्गावर गेल्या बारा वर्षांत ३९ हल्ले झाले. त्यांपैकी २९ हल्ले अयशस्वी झाले. म्हणजे, प्रत्येक चारापैकी एकच हल्ला यशस्वी झाला. बँकेचें काम चालू असतांना, पिस्तुल रोखून नोकरांवर केलेला हल्ला, अंधाराचे वेळीं स्ट्राँग रूमवर केलेला हल्ला, नागरिकांना मारहाण करून पळून जाणें, असे हल्ल्यांचे मुख्य तीन प्रकार आहेत. नोकरवर्गाचें संरक्षण करणें हें आमचें आद्य कर्तव्य आहे, पण बँकेंत येणाऱ्या गिऱ्हाइकांचेंहि संरक्षण करायला हवे. आमच्या बँकेनें प्रत्येक नोकराचा १०,००० पौंडांचा विमा उतरलेला आहे; नोकराला तो काम करीत असतांना गंभीर जखम झाल्यास ह्या विम्याचा त्याला फायदा मिळेल. बहुतेक शाखांत धोक्याचे गजर बसविण्यांत आले आहेत. जुन्या पद्धतीच्या गजरांत, रस्त्यावर घंटानाद होण्याची तरतूद असे, पण तेथून जाणारे-येणारे आपण होऊन धावून येण्यावर विसंबता येणार नाहीं. चोर ओळखले जावे आणि पकडले जावे, अशा रीतीनें नव्या पद्धतीच्या योजना आम्हीं आंखल्या आहेत. त्यासाठी बसविण्यांत आलेली सामग्री एकसारखी सुधारणा पावत आहे; त्यांच्या विविधतेमुळें चोरांचें काम त्यांना धोकादायक बनलें आहे. स्फोटकांना दाद न देणाऱ्या स्ट्राँग रूम्स बनविण्यांत येत आहेत. चोराला आपलें उद्दिष्ट साधतांच येऊं नये, त्यापूर्वीच धोक्याचा इशारा जाहीर व्हावा, ह्या दृष्टीनें रचना करण्यांत येत आहे. अधिक तपशील देणें अर्थातच श्रेयस्कर होणार नाहीं. ह्या सर्वांसाठी बराच खर्च येत असला तरी सुरक्षितपणासाठी तो करायलाच हवा.

काउंटरच्या बाहेर आणि रस्त्यावर होणारे हल्ले आणि रोकड रकमेची वाहतूक, ह्याबाबतहि दक्षता घेतली जात आहे. कॅशच्या आणण्या—नेण्याचे दिवस आणि वेळ बदलत राहणें, त्याविषयीं पूर्ण गुप्तता राखणें, पोलिसांच्या सहकार्यानें शाखाधिकाऱ्यांनीं कार्यक्रम ठरविणें, जरूर त्यावेळीं पोलिसांना आगाऊ सूचना देणें, इत्यादि मार्गांचा अवलंब केला जात आहे. पोलिसांची संख्या ह्या कामीं पुरी पडण्याजोगी नाहीं, ही एक अडचण आहे. हल्ले करणाऱ्यांपैकी कितीतरी अल्पवयी मुलें असतात; पालक आपलें मुलांविषयींचें कर्तव्य बजावीत नसल्याचा तो पुरावा आहे. "

बार्क्लेज् बँक लि. चे चेअरमन, मि. अँथनी विल्यम टुक, ह्यांनीं, बँक घेत असलेल्या दक्षतेचें वरीलप्रमाणें विवेचन आपल्या वार्षिक निवेदनांत केलें आहे, तें आपल्या बँकांनाहि उद्बोधक वाटेल, ह्यांत शंका नाहीं.

---

## दोन आर्थिक दैनिकें

सुप्रसिद्ध दि इंडियन एक्सप्रेस न्यूज पेपर्सच्या विद्यमानें चालू सालीं पाडव्याच्या मुहूर्तावर मुंबईहून ' फिनॅनशिअल एक्सप्रेस ' हें अर्थविषयक नवें इंग्रजी दैनिक सुरू करण्यांत आलें आहे. भारतांतील आणि बाह्य जगांतील आर्थिक घडामोडींचे, औद्योगिक आणि व्यापार—कारखाने इ. संबंधानें खास वृत्त प्रकाशन करणारें हें दुसरें दैनिक होय. पहिलें, बेनेट कोल्मन् कंपनी—टाइम्स ऑफ इंडिया ग्रुपतर्फे ' एकॉनामिक टाइम्स ' हें याच धर्तीवर इंग्रजी दैनिक गेल्या ५ मार्च रोजीं सुरू झालें आहे. भारतीय वृत्तपत्रांत या नव्या दोन दैनिकांचा विशेष उल्लेख करणें योग्य होईल.

## परदेशीय खाजगी भांडवलाला संधि

बँक ऑफ इंग्लंडचे सल्लागार मि. ई. पी. हॅझलम ह्यांनीं भारताच्या आर्थिक प्रगतीविषयीं आपले विचार एका मुलाखतींत व्यक्त केले आहेत. भारताच्या आर्थिक परिस्थितीची माहिती करून घेण्यासाठी ते तीन आठवड्यांच्या दौऱ्यावर आले आहेत. आठ वर्षांपूर्वी ते असाच दौरा करून गेले होते. ते आपल्या मुलाखतींत म्हणाले कीं, अविकसित देशांत आतांपर्यंत जें परदेशीय भांडवल गुंतविण्यांत आलें आहे तें सरकारी मालकीचें आहे. ज्या ठिकाणीं योग्य संधि असेल अशाच ठिकाणीं खाजगी भांडवल आकर्षित होत असतें. खाजगी भांडवलाला आपल्या भवितव्याविषयीं चिंता वाटत असेल तर ते साहजिकच बुजरें बनतें. पण आतां अप्रगत देशांतील भांडवल गुंतवणुकीबाबतचें वातावरण बरेंच बदललें आहे. कांहीं वर्षांपूर्वी वाटणारी अनिश्चितता आतां बऱ्याच प्रमाणांत निवळली आहे. ब्रिटन, जर्मनी, इत्यादि देशांतील खाजगी भांडवल आतां पुन्हां हालचाल करूं लागलें आहे. भारतामधील भांडवलदारांनीं ह्या संधीचा फायदा जरूर घेतला पाहिजे. अविकसित देशांना आज सर्व प्रकारच्या परदेशीय भांडवलाची गरज आहे. भारताच्या आर्थिक विकासाच्या कार्यांत शेतीवर भर देण्यांत यावा कीं उद्योगधंद्यावर, असा प्रश्न विचारला जातो. पण हा प्रश्न सयुक्तिक नाहीं. भारतामधील बहुसंख्य लोक आजहि आपल्या चरितार्थासाठी शेतीवर अवलंबून आहेत. तेव्हां उद्योगधंद्यांबरोबरच शेतीच्या विकासाकडेहि सारखेंच लक्ष पुरविण्यांत आलें पाहिजे. तसें झाल्यास दोन्ही अंगांचा समतोल विकास होईल आणि अर्धविकसित देशांपुढें जे आर्थिक प्रश्न आहेत त्यांची सोडवणूक करणें सुलभ होईल.

---

## भारताला दिलेल्या कर्जाचा योग्य उपयोग

अमेरिकेच्या एक्सपोर्ट-इंपोर्ट बँकेचे प्रतिनिधि मि. सिडने शेरवुड ह्यांनीं परदेशीय कर्जाच्या भारत सरकारनें केलेल्या उपयोगाबद्दल प्रशंसोद्गार काढले आहेत. ते मुंबई येथें बोलतांना म्हणाले कीं भारत सरकारचीं द्रव्यविषयक धोरणें आणि परदेशीय कर्जाचा त्यानें केलेला उपयोग, ह्यांच्यामुळें अमेरिकन भांडवलाला भारताबद्दल अधिक आस्था वाटूं लागली आहे. अमेरिकेची मदत घेणारे कांहीं देश असे आहेत कीं त्यांनीं आपली परदेशी हुंडणावळ चैनीच्या वस्तूंवर उधळून टाकली आहे. उलटपक्षीं, भारतानें आपल्या हुंडणावळीची जपणूक करून, गरिबीनें राहून सुद्धां प्रगल्भ अशा प्रकारचीं आर्थिक धोरणें स्वीकारलीं आहेत. रशिआ व अमेरिका ह्यांच्यामधील शीतयुद्धामुळें अमेरिका भारताला भांडवल पुरवीत आहे, हें म्हणणें खरें नाहीं.

---

## डिपॉझिट इन्शुअरन्स योजना

रिझर्व्ह बँकेच्या अधिकाऱ्यांनीं तयार केलेली डिपॉझिट इन्शुअरन्स योजना इंडियन बँक्स असोसिएशननें तत्वत: मान्य केली आहे, पण त्यांत दुरुस्त्या सुचविल्या आहेत. सक्तीच्या विम्याची ठेवीची रकम १,००० रु. ऐवजीं २,००० रु. असावी आणि हप्त्याचा दर १% च्या एक दशांशाऐवजी १% च्या एक बत्तिसांश असावा, अशी असोसिएशनची सूचना आहे. ८०% पेक्षा जास्त ठेवीदारांच्या ठेवी, १,००० रु. पेक्षा कमी आहेत आणि ह्या लहान ठेवींची एकूण रकम एकूण ठेवींच्या १५% भरते.

---

## शेड्यूल्ड बँकांचीं तारणावरील कर्जें ( कोटी रु. )

| तारणाचें स्वरूप | २६-१२-१९५८ | २४-१२-१९५९ | ३०-१२-१९६० | फरक १९५९ | फरक १९६० |
|---|---|---|---|---|---|
| **१. अन्नपदार्थ** ... | ३४·६४ | ४३·६० | ७४·४५ | +८·९६ | +३०·८५ |
| १. तांदूळ व भात ... | ५·४० | ७·८२ | ७·३० | +२·४२ | −०·५२ |
| २. गहूं ... | ०·७३ | १·०८ | २·३८ | +०·३५ | +१·३० |
| ३. इतर धान्यें व डाळी ... | ४·४६ | ५·६३ | ५·८५ | +१·१७ | +०·२२ |
| ४. साखर व गूळ ... | १९·२८ | २०·६२ | ४७·५५ | +१·३४ | +२६·९३ |
| ५. वनस्पति तेलें ... | ४·७७ | ८·४५ | ११·३७ | +३·६८ | +२·९२ |
| **२. औद्योगिक कच्चा माल** ... | ७१·९१ | ८४·०४ | १११·५६ | +१२·१३ | +२७·५२ |
| १. भुईमूग ... | ९·१५ | ८·६३ | ११·०७ | −०·५२ | +२·४४ |
| २. इतर तेलबिया ... | ७·९२ | ११·६४ | ७·५८ | +३·७२ | +४·०६ |
| ३. कपास ... | ३८·८० | ४५·१९ | ६७·७० | +६·३९ | +२२·५१ |
| ४. कच्चा ताग ... | १०·७७ | १३·६७ | १९·५७ | +२·९० | +५·९० |
| ५. कातडी ... | ५·२७ | ४·९१ | ५·६४ | +०·३६ | +०·७३ |
| **३. मळ्यांचें उत्पादन** ... | ४०·०५ | ३७·१६ | ४७·४१ | +२·८९ | +१०·२५ |
| १. मसाल्याचे पदार्थ | १·९९ | ४·१९ | ४·०० | +९·२० | −०·१९ |
| २. काजू ... | २·३० | १·८६ | ३·७० | +०·४४ | +१·८४ |
| ३. चहा ... | ३२·३४ | २७·१० | ३२·८३ | +५·२४ | +५·७३ |
| ४. कॉफी ... | ३·४२ | ४·०१ | ६·८८ | +०·५९ | +२·८७ |
| **४. पक्का माल व खाणीचें उत्पादन** | २८१·९६ | ३१०·५९ | ४१०·५७ | +२८·६३ | +९९·९८ |
| १. कपास कापड ... | ९९·८३ | ९४·४७ | ११०·७० | —५·३६ | +१६·२३ |
| २. तागी माल ... | २०·१२ | १४·९४ | २२·६८ | —५·१८ | +७·७४ |
| ३. इतर विणलेला माल ... | १६·६१ | १९·४५ | १९·३६ | + २·८४ | −०·०९ |
| ४. लोखंड, पोलाद, इ. ... | ८७·२५ | १०४·२८ | १५३·९८ | +१७·०३ | +४९·७० |
| ५. इतर धातूंचा माल ... | ११·८३ | १५·३२ | २०·४७ | +३·४९ | +५·१५ |
| ६. कोळसा, मँगेनीज, अभ्रक ... | ९·७७ | १२·६७ | १४·३२ | +२·९० | +१·६५ |
| ७. रसायनें, रंग, औषधें ... | १४·३३ | २०·४४ | २६·२५ | +६·११ | +५·८१ |
| ८. विजेचा माल ... | ५·२२ | ८.२३ | १५·०५ | +३·०१ | +६·८२ |
| ९. रबर व रबरी माल ... | २·१८ | ३·६१ | ६·६० | +१·४३ | +२·९९ |
| १०. इतर तयार माल ... | १४·८२ | १७·१८ | २१·१६ | +२·३६ | +३·९८ |
| **६. इतर तारणें** ... | २७२·२६ | ३०६·६३ | ३५९·८९ | +३४·३७ | +५३·२६ |
| १. मालमत्ता ... | २०·१४ | २३·२३ | २४१·१८ | +३·०९ | +०·९५ |
| २. मुदत ठेवी ... | १३·११ | १५·५५ | १८·८० | +९·४४ | +३·२५ |
| ३. सरकारी व इतर रोखे ... | ४१·३६ | ४१·५० | ४३·७२ | +०·१४ | +२·२२ |
| ४. शेअर्स, डिबेंचर्स ... | ८१·१२ | ९१·१९ | ९८·४६ | +१०·०७ | +७·२७ |
| ५. कारखान्यांची जिंदगी ... | ३७·१६ | ३४·४४ | ४९·५१ | −२·७२ | +१५·०७ |
| ६. इतर तारण ... | ६१ ६५ | ८४·४० | १०६·३१ | +२२·७५ | +२१·९१ |
| ७. संमिश्र कर्जें ... | १७·७२ | १६·३२ | १८·९१ | −१·४० | +२·५९ |
| **७. तारणावरील एकूण कर्जें** ... | ७००·८२ | ७८२·०२ | १००३·८८ | +८१·२० | +२२१·८६ |

### ग्रामीण भागांतील डॉक्टरांच्या वेतनांत वाढ

डॉक्टर लोक खेड्यांतून व्यवसायासाठी जाण्यास फारसे तयार नसतात. हें लक्षांत घेऊन उत्तरप्रदेश सरकारनें खेड्यांतील दवाखान्यांतून काम करणाऱ्या डॉक्टरांची वेतनश्रेणी अधिक आकर्षक केली आहे. उत्तर प्रदेशांतील फरुकाबाद जिल्ह्यांतील सात खेडेगांवांत गेले सहा महिने डॉक्टरच नाहींत, ह्या गोष्टीकडे राज्याच्या विधानसभेंत विरोधी पक्षानें लक्ष वेधलें होतें. त्याला उत्तर म्हणून राज्याच्या मुख्य मंत्र्यांनीं वरील घोषणा केली. ह्या खेडेगांवांतून डॉक्टर्स नसल्यामुळें कम्पौंडरच त्यांचें काम जमेल तसें करीत होते.

### सिनेमा कामगारांना मोफत विमा

सिनेमागृहांतून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची अखिल भारतीय परिषद् वाराणशी येथें नुकतीच भरली होती. कर्मचाऱ्यांच्या वेतनांत एकवाक्यता आणण्यासाठी वेजबोर्ड नेमण्यांत यावें, अशी परिषदेनें मागणी केली. वेतनांत तावडतोब २५% वाढ व्हावी, सरकारनें प्रत्येक कामगाराचा ५,००० रु. चा विमा मोफत उतरावा व त्याचे हप्ते करमणुकीच्या करांतून सरकारनें भरावे, सणाच्या सुट्या मिळाव्या, असेहि ठराव परिषदेनें संमत केले.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.